E2169729

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

सहकार हाईट (पाच मजली इमारत), पहिला मजला, महानगरपालिका बिल्डींग, डिवाईन चर्च जवळ,
मिनाताई ठाकरे मंडईच्या बाजूला, रामदेव पार्क, मिरा रोड (पू.) ४०१ १०७ ईमेल : dtomhmbd@rntcp.org

जा.क्र.मनपाराक्षदुका/ 42 /2024-25 दि. 29 /06/2024.

**क्षयरोगाच्या कामगिरीत मिरा भाईंदर महानगरपालिकेने राज्यात दुसरा क्रमांक पटकावला.**

मा. पंतप्रधान यांनी सन 2025 पर्यंत भारत देश क्षयरोग मुक्त धोरण करण्याचे निश्चित केले आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत संशयीत क्षयरुग्णाच्या तपासण्या औषधोपचार सेवा व सुविधा मोफत पुरविल्या जातात. क्षयरोगाचे प्रमाण हे कमी करण्यासाठी जास्तीत जास्त क्षयरुग्ण शोधून त्यामधून रुग्ण निदान केले जाते. प्रत्येक वर्षी शासनाकडून वरील बाब पुर्ण करण्यासाठी ठराविक उदिदष्ट जिल्हा / महानगरपालिकेस दिले जाते.

महाराष्ट्र राज्याने ठरवून दिलेल्या एकुण अकरा उदिदष्टांपैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेने राज्यातील 22 महानगरपालिका मध्ये क्षयरोगाचे कामगिरीत (जानेवारी 24 ते जून 24) मध्ये एकुण 77.80 गुण मिळवून राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे.

शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बालनाथ चकोर, यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व क्षयरोग कर्मचारी, वैदयकीय अधिकारी, परिचारिका, प्रसविका, बहुउद्देशीय कामगार व लिंक वर्कर क्षयरोगाच्या कामात मोलाची कामगिरी केली आहे, आतापर्यंत 1318 रुग्णांपैकी 1187 (90 टक्के) रुग्ण हे क्षयरोगाच्या आजारापासून बरे केले आहेत.

वरील काम पूर्ण करण्यात वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ. बी.टी दुधभाते, अतिरिक्त आयुक्त मा. डॉ. संभाजी पानपट्टे व मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने क्षयरोगाचे काम पूर्ण करण्यात महानगरपालिका यशस्वी ठरली आहे.

**(डॉ. बालनाथ चकोर)**
**शहर क्षयरोग अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**